पान नं ३, [illegible] 2021, [illegible] भारत

# ओमिक्रॉनविषयी नवनिर्माण महाविद्यालयातर्फे जनजागृती



**संगमेश्वर : ओमिक्रॉन विषयी पथनाट्य सादर करताना नवनिर्माण महाविद्यालय आणि नर्सिंगचे विद्यार्थी.**

प्रतिनिधी
संगमेश्वर

कोरोनाचा नवीन व्हेरीयंट ओमिक्रॉन विषयी लोवले येथील नवनिर्माण महाविद्यालय आणि नर्सिंग कॉलेजच्यावतीने संगमेश्वर बस स्थानक, रेल्वे स्थानक आणि बाजारपेठ परिसरात जनजागृती करण्यात आली.

ओमिक्रॉनविषयी जनतेतील संभ्रम दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली.

यावेळी नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य प्रज्ञा कदम, कार्यक्रम अधिकारी अनिल नेमन उपस्थित होते यावेळी मास्क आणि सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्राचार्या रूपाली आनेराव व प्राध्यापकाचे मार्गदर्शन लाभले.

दै. सागर रत्नागिरी आवृत्ती रविवार दि. ३१ मार्च २०२४

# नर्सिंग हा जात, धर्मापलिकडे घेऊन जाणारा व्यवसाय : डॉ. अलिमियाँ परकार

**संगमेश्वर** : 'नर्सिंग हा जात, धर्म यापलीकडे घेऊन जाणारा व्यवसाय आहे. मेडिकल तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक असून आर्टिफिशियल इंटेलिजेन्सीमध्ये नर्सिंग व्यवसायाने मागे राहू नये. नवतरुण राहण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. अलिमियाँ परकार यांनी केले.




**लोवले नर्सिंग महाविद्यालयाच्या वतीने डॉ. अलिमियाँ परकार यांचा सत्कार करताना नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन श्री. अभिजित हेगशेट्ये. सोबत सौ. सीमा हेगशेट्ये, डॉ. प्रज्ञा कदम, डॉ. संजना चव्हाण, सपना नाईक, दिशा भाटकर आदी.**

नवनिर्माण नर्सिंग महाविद्यालय संगमेश्वरच्या लॅम्प लाइटिंग कार्यक्रमात डॉ. परकार बोलत होते. या वेळी व्यासपिठावर चेअरमन अभिजीत हेगशेट्ये, प्राचार्या डॉ. प्रज्ञा कदम, डॉ. संजना चव्हाण, सपना नाईक, दिशा भाटकर, संचालिका सौ. सीमा हेगशेट्ये आदी मान्यवर उपस्थित होते. नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा कदम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी बोलताना सपना नाईक यांनी नर्सिंग हा घराच्या चुलीपर्यंत जाणारा व्यवसाय असून स्वतःचा श्वास देऊन दुसऱ्याला जिवंत करता येणारा परमार्थ असल्याचे सांगितले. दिशा भाटकर यांनी माणसामध्ये देव शोधा जनसेवा म्हणजेच ईश्वर सेवा देव दिसण्यापेक्षा असण्यावर भर द्या, असे सांगितले.

या वेळी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये यांनी नवनिर्माण घडवणारी शिक्षण संस्था संगमेश्वरसारख्या खेडेगावात नर्सिंग शिक्षण सुरु करण्याचे धाडस, त्याचा सकारात्मक परिणाम म्हणजे यावर्षी पहिली बॅच अभ्यासक्रम पूर्ण करून बाहेर पडेल. पुढील काळात नर्सिंगमध्ये मायक्रोसिस्टीम अवगत होईल, असे सांगत नवीन व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरु करणार असल्याचे अभिजित हेगशेट्ये यांनी सांगितले.

# संविधानात जगण्याची दिशा देण्याचं सामर्थ्य

वार्ताहर
संगमेश्वर

भारतीयत्वाची ओळख असणाऱ्या संविधानात जगण्याची दिशा देण्याचं सामर्थ्य आहे, असे प्रतिपादन राजवैभव शोभा रामचंद्र यांनी केले. नवनिर्माण महाविद्यालय, संगमेश्वर येथे विद्यार्थ्यांशी चला संविधानावर बोलू काही, या कार्यक्रमात ते बोलत होते.

राष्ट्र सेवादलाच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या कौटुंबिक जगण्याचे, समाजात वावरण्याचे काही अलिखित नियम असतात आणि आपण त्यानुसार दैनंदिन वर्तन करतो. मग ज्या नियमांनी देश चालतो ते जाणून घ्यायला हवे की नको, असा सवाल करत संविधान जगण्यात आणायचं कसं यासंबंधी त्यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज केले. संविधानाची उद्देशिका केवळ एका वाक्याची आहे मात्र या एका



संगमेश्वर : कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर.

वाक्यात भारतीय लोकांना जगण्याची दिशा देण्याचं सामर्थ्य आहे. भारतीयत्वाची ओळख असणाऱ्या संविधानाला जाणून घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

संविधानाबद्दलच्या अभंगाने आणि भारूडाने कार्यक्रमात उत्तरोत्तर रंगत आणली. ओघवत्या आणि सहज संवादातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटनाकार म्हणून ओळख विद्यार्थ्यांना झाली. तसेच आपल्या रोजच्या जगण्यात आपण कसे असंविधानक बोलत, वागत असतो याचे भान विद्यार्थ्यांना आले. संविधानाच्या प्रास्ताविकेत असलेल्या स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय यांचं आपल्या आयुष्यातील महत्त्व यावेळी उलगडून दाखवले. यावेळी नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रज्ञा कदम, रुपाली अणेराव, सतीश शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते. चेअरमन अभिजित हेगशेट्ये यांचे मार्गदर्शन लाभले.

# चुका मान्य केल्या पाहिजेत- डॉ. देशमुख

वार्ताहर
संगमेश्वर

आपल्यातल्या चुका मान्य करून त्या स्वीकारल्या पाहिजेत. व्यक्तीला जिंकण्याची आणि हरण्याची सवय असली पाहिजे. पुस्तके वाचून त्यातील घटक अभ्यासून आपला व्यक्तिमत्व विकास घडतो. व्यक्तिमत्व विकासाठी आपल्याला काय आले पाहिजे याचा अभ्यास करणे आवश्यक असते, असे प्रतिपादन शास्त्रज्ञ आणि गणित तज्ञ डॉक्टर दिलीप देशमुख यांनी केले

येथील नवनिर्माण महाविद्यालयात 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते

यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, प्रतिव्यक्तिमत्व विकासासाठी चांगले शिक्षक मिळणे आवश्यक असते. व्यक्तिमत्व विकासामध्ये आत्मविश्वास हा पैलू महत्त्वाचा असून आपल्यामध्ये आत्मविश्वास असल्यास आपण यशाचे शिखर सर करू शकतो. अनेक उदाहरणाद्वारे त्यांनी यश मिळवण्यासाठी मेहनत घेणे किती अत्यावश्यक असल्याचे सविस्तर पटवून दिले.

प्रा. संतोष खरे यांनी डॉ. दिलीप देशमुख यांची व्यक्तिमत्व विकाससारखी व्याख्याने सर्वत्र आयोजित करून महत्व पटवून दिले पाहिजे असे सांगितले. यावेळी प्राचार्य प्रज्ञा कदम यांनी डॉ. देशमुख यांनी दिलेल्या व्याख्यानातून व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्वाचे पैलू उलगडल्याचे सांगितले.

यावेळी प्राचार्या प्रज्ञा कदम, प्रा. संतोष खरे, प्रा. शेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. अनिल नेमण यांनी केले.



संगमेश्वर : व्याख्यान देताना डॉ. दिलीप देशमुख.

# नवनिर्माण नर्सिंग कॉलेजतर्फे संगमेश्वर बसस्थानकात जनजागृती

**संगमेश्वर :** संगमेश्वर लोवले येथील नवनिर्माण कॉलेज ऑफ नर्सिंगच्यावतीने संगमेश्वर बस स्थानक येथे जागतिक हृदय दिनानिमित्त पथनाट्यातून हृदयाशी संबंधित आजारांबाबत जनजागृती करण्यात आली.

संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्ये, प्राचार्या प्रज्ञा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सिगच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी हृदयाचे आरोग्य सुस्थितीत राखण्याकरीता जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. यावेळी प्राध्यापक उपस्थित होते.